सेंटर फॉर डिस्टन्स ॲन्ड ऑनलाईन एज्युकेशन
दि. २३/०९/२०२२

विषय : सेंटर फॉर डिस्टन्स ॲन्ड ऑनलाईन एज्युकेशनकडील बी.ए., बी. कॉम, एम.ए., व एम. एस्सी. गणित या अभ्यासक्रमाच्या भाग १ च्या स्वयंअध्ययन साहित्याबाबत.

संदर्भ : १) अभ्यास मंडळे विभागाचे SU/BOS/Com. & Mgmt/ दि.१२/०९/२०२२ रोजीचे पत्र
२) अभ्यास मंडळे विभागाचे SU/BOS/Science/ दि.१३/०९/२०२२ रोजीचे पत्र
३) अभ्यास मंडळे विभागाचे SU/BOS/Humanities/ दि.१९/०९/२०२२ रोजीचे पत्र
४) अभ्यास मंडळे विभागाचा दि. २१/०९/२०२२ रोजीचा ई–मेल

सादर,

उपरोक्त संदर्भिय पत्रांन्वये अभ्यास मंडळे विभागाने नवीन शैक्षणिक धोरणानुसारच्या बी.ए., बी.कॉम, एम.ए., व एम. एस्सी, (गणित) या पाठयक्रमांच्या भाग १ (सत्र १ व २) च्या सुधारित अभ्यासक्रमांना विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली असून सदरचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२ – २०२३ पासून लागू होत असल्याचे कळविले आहे.

याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, सेंटर फॉर डिस्टन्स ॲन्ड ऑनलाईन एज्युकेशनकडून बी. ए (मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, संस्कृत, अर्धमागधी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, शिक्षणाशास्त्र, व भूगोल) बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र) एम. एस्सी, (गणित) या विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य तयार केले जाते. यापुर्वी अभ्यासमंडळे विभागाने जा.क्र एसयु/बीओएस दि. १३ मे २०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२२ – २०२३ साठी एक वर्ष मुदतवाढ देण्यात आल्याचे कळविले होते. तथापि उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये अभ्यासमंडळे विभागाने बी.ए., बी. कॉम, एम.ए., व एम. एस्सी (गणित) या पाठयक्रमाचे अभ्यासक्रम सुधारित करण्यात आल्याचे तसेच ते शैक्षणिक वर्ष २०२२ – २०२३ पासून लागू होत असल्याचे कळविले आहे.

सेंटर फॉर डिस्टन्स ॲन्ड ऑनलाईन एज्युकेशनकडे उपरोक्त पाठयक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०१७ – २०१८ व २०१८ – २०१९ मध्ये सुधारित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले बहुतांश स्वयंअध्ययन साहित्य छपाई करुन तयार आहे. सेंटर फॉर डिस्टन्स ॲन्ड ऑनलाईन एज्युकेशनची शैक्षणिक वर्ष २०२२ – २०२३ ची प्रवेश प्रक्रिया सद्या सुरु असून प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाचे स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करुन द्यावे लागणार आहे.

अभ्यासमंडळे विभागाच्या उपरोक्त संदर्भिय पत्रांना अनुसरुन सुधारित अभ्यासक्रम व सेंटर फॉर डिस्टन्स ॲन्ड ऑनलाईन एज्युकेशनकडून यापुर्वी तयार करण्यात आलेले स्वयंअध्ययन साहित्य यांची पडताळणी संबधित विषयाच्या अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांचेकडून करुन घेवून त्यांच्या अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सदरची बाब विचारात घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाची मुदत संपली असल्याने अभ्यासमंडळे विभागाच्या दि.१९/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये नियुक्त करण्यात आलेल्या संबधित अभ्यासमंडळाच्या समन्वयकांकडून सदरची पडताळणी करुन घेवून त्यांच्या अभिप्रायानुसार याबाबतची पुढील कार्यवाही करणेस मान्यता असावी.

मान्यतेसाठी सादर [signature] Kulkarni

(अ) प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यतेसाठी सादर. [signature]

कक्ष अधिकारी 23.9.2022

[signature] Shinde 23-09
सहाय्यक कुलसचिव

(अ) मान्य व्हावे. तसेच ...अभ्यासक्रम सुधारित ... स्वयंअध्ययन साहित्याची पडताळणी करून घेण्यास मान्यता असावी.

उपकुलसचिव [signature] 23-9

[signature] 23/9/22
मा.संचालक

[signature]
मा.प्र.कुलसचिव